**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**शनिवार दिनांक १६ मे २०२६**

**ठळक बातम्या**

1. **बहुप्रतीक्षित नागपूर ते मडगाव रेल्वे सेवा सुरू झाल्याने नागपूरकरांचा गोव्याचा प्रवास सोपा होणार -केंद्रीय मंत्री नितीन गडकरी.**
2. **पेट्रोलवरच्या निर्यात शुल्कात ३ रुपये वाढ, तर डिझेल आणि विमान इंधनावरच्या निर्यात शुल्कात कपात.**
3. **अकोला जिल्ह्यातील भीषण रस्ते अपघातात २ जण ठार, तर ६ जण जखमी.**
4. **विदर्भाच्या सर्व जिल्ह्यांमध्ये अत्याधिक उष्णतामान कायम, ४५.५ अंश सेल्सियस सह वर्धा जिल्हा ठरला सर्वात उष्ण.**

---

नागपूर-मडगाव रेल्वे सेवा

नागपूर ते मडगाव रेल्वे सेवा सुरू झाल्याने कोकण आणि मध्य रेल्वे जोडल्या गेले आहेत यामुळे नागपूरकरांचा गोव्याचा प्रवास सोपा होणार असून ही गाडी सध्या दोन दिवस नागपूरवरुन आणि मडगावरुन धावणार आहे. या गाडीला प्रवाशांचा प्रतिसाद सुद्धा शंभर टक्के मिळाला आहे. जर असाच प्रतिसाद मिळाला तर रेल्वे प्रशासन लवकरच ही गाडी रोज चालवण्याचा प्रयत्न करेल असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज केले .

***(होल्ड बाईट - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी - २८ सेकंद)***

मध्य रेल्वेच्या नागपूर स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्रमांक 8 वर आज नागपूर ते मडगाव या एक्सप्रेसला हिरवी झेंडी दाखवल्यानंतर ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते. या प्रसंगी नागपूरच्या महापौर नीता ठाकरे, मध्य नागपूरचे आमदार प्रवीण दटके, मध्य रेल्वे नागपूरचे विभागीय महाव्यवस्थापक विनायक गर्ग, नागपूरचे जिल्हाधिकारी कुमार आर्शिवाद उपस्थित होते. नागपूर मध्ये वाहतूक व्यवस्था ही सर्वोच्च दर्जाची आहे असे नमुद करून गडकरी यांनी नागपूर तसेच अजनी रेल्वे स्टेशनच्या पुनर्विकासाचे काम चालू असून अजनीच्या जवळ असणाऱ्या कारागृहाची जागा देखील आता पाटणसावंगीजवळ करण्याचे नियोजन असल्याची माहिती दिली.नागपूर-मडगाव दरम्यान धावणाऱ्या विशेष गाडीचे नियमितीकरण करत

तिला आता 11203/11204 नागपूर-मडगाव एक्सप्रेस म्हणून मान्यता मध्य रेल्वेने दिली आहे. ही द्वि-साप्ताहिक गाडी नागपूरहून बुधवार आणि शनिवार रोजी दुपारी 3 वाजून 5 मिनिटांनी सुटून मडगावला दुसऱ्या दिवशी सायंकाळी 5.45 वाजता पोहोचेल. मडगावहून गुरुवार आणि रविवार रोजी रात्री 8 वाजता सुटणारी गाडी नागपूरला दुसऱ्या दिवशी रात्री 9.30 वाजता येईल. गाडीला वर्धा, अकोला, भुसावळ, नाशिक रोड, पनवेल, रत्नागिरी, कणकवली, सावंतवाडी रोड आदी महत्त्वाच्या स्थानकांवर थांबा देण्यात आला आहे.

---------------------------------------

उत्पादन शुल्क

पेट्रोलच्या निर्यातीवर प्रति लिटर अतिरिक्त उत्पादन शुल्क तीन रुपयांनी वाढवण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. पेट्रोलची निर्यात मोठ्या प्रमाणात होऊ नये यासाठी सरकारने हा निर्णय घेतल्याचं सांगितलं जात आहे. दुसरीकडे डिझेलच्या निर्यातीवरचं उत्पादन शुल्क प्रति लिटर २३ रुपयांवरून कमी करून १६ रुपये ५० पैसे इतकं करण्यात आलं आहे. अर्थ मंत्रालयाने काल प्रसारित केलेल्या अधिसूचनेत ही माहिती दिली. विमानाच्या इंधनावरचं उत्पादन शुल्कही कमी करून १६ रुपये ३३ पैसे करण्यात आलं आहे. हे दर आजपासून पुढील पंधरवड्यापर्यंत लागू असतील.

---------------------------------------

सीबीएसई

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ म्हणजेच 'सीबीएसई'ने इयत्ता बारावीच्या निकालांनंतरच्या प्रक्रियेबाबत एक अधिसूचना जारी केली आहे. आपल्या गुणांवर असमाधानी असलेल्या विद्यार्थ्यांसाठी मंडळाने दोन टप्प्यांची पडताळणी प्रणाली उपलब्ध करून दिली आहे. याअंतर्गत पहिल्या टप्प्यात, विद्यार्थी त्यांच्या उत्तरपत्रिकांची स्कॅन केलेली प्रत ऑनलाइन मिळवू शकतात. तर दुसऱ्या टप्प्यात, विद्यार्थी गुणांची पडताळणी किंवा विशिष्ट उत्तरांच्या पुनर्मूल्यांकनासाठी विनंती करू शकतात. उत्तरपत्रिकांच्या स्कॅन प्रतीसाठी विद्यार्थ्यांना या महिन्याच्या १९ ते २२ तारखेपर्यंत प्रति विषय ७०० रुपये शुल्क भरून ऑनलाइन अर्ज करता येईल. तर गुणांच्या पडताळणी आणि पुनर्मूल्यांकनासाठी २६ ते २९ मे दरम्यान अर्ज सादर करता येतील, असे मंडळाने स्पष्ट केले आहे.

---------------------------------------

जनगणना २०२७

जनगणना २०२७ अंतर्गत महाराष्ट्रासह राज्यं आणि दिल्ली महानगरपालिका क्षेत्रात स्वगणनेचा कालावधी काल संपला आणि आजपासून घर यादी आणि गृहगणनेचा दुसरा टप्पा सुरू होत आहे. या टप्प्यांतर्गत, १६ मे ते १४ जून या कालावधीत प्रगणक माहिती संकलित करण्यासाठी किंवा नोंदवून घेण्यासाठी घरोघरी भेट देतील. सरकारनं अधिसूचित केलेल्या ३३ प्रश्नांची माहिती मोबाइल ॲप्लिकेशनद्वारे संकलित केली जाईल. ज्यांनी स्वगणना प्रक्रिया पूर्ण केली आहे, त्यांच्या एसई आयडीद्वारे त्यांनी भरलेल्या माहितीची पडताळणी प्रगणक करतील.

---------------------------------------

चंद्रशेखर बावनकुळे

राज्यातील घरं आणि शेतीविषयक शर्तभंग नियमितीकरण प्रक्रियेला गती देण्यासाठी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ऐतिहासिक निर्णय घेत जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार सोपविले आहेत. नव्या निर्णयानुसार १० लाख रुपयांपर्यंत दंड असलेली शर्तभंग प्रकरणे जिल्हाधिकारी, तर २० लाख रुपयांपर्यंतची प्रकरणे विभागीय आयुक्त निकाली काढणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार घेतलेल्या या निर्णयामुळे नागरिकांना छोट्या प्रकरणांसाठी मंत्रालयात जाण्याची गरज भासणार नाही. यासंदर्भातील राजपत्र काल करण्यात आले असून शर्तभंग प्रकरणांना आता स्पष्ट कायदेशीर आधार मिळाला आहे.

---------------------------------------

अपघात

राष्ट्रीय महामार्गावरील अकोला जिल्ह्यातील बोरगाव मंजू पोलिस ठाण्याच्या हद्दीत नवीन बायपासजवळ उभ्या कंटेनर ट्रकला इको प्रवासी कारची मागून जोरदार धडक बसून भीषण अपघात झाला. या अपघातात ७० वर्षाचे वयस्क आणि 7 वर्षीय बालकाचा मृत्यू झाला, तर सहा प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. प्राथमिक माहितीनुसार, ट्रक चालकाने कोणतेही दिशादर्शक चिन्ह किंवा लाईट न लावता वाहन महामार्गावर उभे केल्याने हा अपघात घडल्याचे सांगितले जात आहे. जखमींमध्ये चार महिलांसह कार चालक आणि अन्य प्रवाशांचा समावेश असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

---------------------------------------

जनावरांचा मृत्यू

भंडारा तालुक्यातील मानेगाव बाजार येथे गोठ्याला आग लागून ८ जनावरांचा होरपळून मृत्यू झाला. लघुदाब वाहिनीच्या तार तुटून गोठ्याच्या टिनावर पडल्याने

ही आग लागल्याचे सांगितले जात आहे. या दुर्घटनेत सुमारे ३ लाख रुपयांचे नुकसान झाले. याशिवाय गोठ्यावरील टिनाचे शेड, पशुखाद्य व इतर साहित्य आगीत पूर्णपणे जळून खाक झाले.

---------------------------------------

आंदोलन

आदिवासी विकास विभाग अंतर्गत चालवल्या जाणाऱ्या सरकारी वसतिगृह आणि शैक्षणिक योजनांमधील विविध प्रलंबित मागण्यांसाठी आदिवासी विद्यार्थ्यांनी आज नागपूरच्या आदिवासी विकास आयुक्त कार्यालयासमोर तीव्र आंदोलन सुरू केले. शिष्यवृत्ती वेळेवर मिळत नसल्याने शिक्षणावर परिणाम होत असल्याचा तसेच वसतिगृहांतील निवास, भोजन आणि मूलभूत सुविधांमध्ये अनियमितता असल्याचा विद्यार्थ्यांचा आरोप आहे. कालपासून सुरू असलेल्या धरणे आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांनी संपूर्ण रात्र कार्यालयासमोर ठिय्या देत काढली. मागण्या तातडीने मान्य न झाल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाला दिला आहे.

---------------------------------------

माजी मंत्री सुबोध सावजी

माजी मंत्री सुबोध सावजी यांनी देशातील पाच राज्यांच्या निवडणुकांनंतर निर्माण झालेल्या आर्थिक संकटाच्या पार्श्वभूमीवर सर्व आजी-माजी लोकप्रतिनिधींचे मानधन एका वर्षासाठी गोठवण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात त्यांनी नरेंद्र मोदी यांना पत्र पाठवून अर्थव्यवस्थेला सावरण्यासाठी कठोर निर्णय घेण्याचे आवाहन केले. देशहितासाठी स्वतःचेही मानधन एका वर्षासाठी थांबवण्याची तयारी असल्याचे सावजी यांनी पत्रात नमूद केले आहे. १९७८ पासून मेहकर विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणारे सावजी हे १९९३ मधील काँग्रेस सरकारच्या मंत्रिमंडळातील दिग्गज नेत्यांपैकी एक होते.

---------------------------------------

हवामान

विदर्भाच्या सर्व जिल्ह्यांमध्ये अत्याधिक उष्णतामान कायम असून सर्व जिल्ह्यांमध्ये तापमान 40°c आणि त्या पलीकडे आहे. आज वर्धा जिल्हा विदर्भात सर्वाधिक उष्ण ठरला वर्धा जिल्ह्यात 45 पूर्णांक पाच दशांश अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली आहे त्या पाठोपाठ अमरावती इथे 45.2 अकोला येथे 45.1 तर ब्रह्मपुरी इथं 44.2 दशांश सेल्सिअस इतक्या कमाल

तापमानाची नोंद करण्यात आली आहे नागपुरात आज 43 अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान आहे उर्वरित बुलढाणा चंद्रपूर गडचिरोली गोंदिया या जिल्ह्यांमध्ये तापमान 40 ते 42 अंश सेल्सिअस दरम्यान आहे. आगामी वीस तारखेपर्यंत नागपूर सह वर्धा अमरावती अकोला या जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट कायम राहणार आहे. दरम्यान उष्णतेच्या लाटेचा इशारा जारी करण्यात आल्याने प्रशासनाने नागरिकांना 11 ते 4 या वेळेत बाहेर न पडण्याचा आवाहन केलं असून उष्णतेपासून बचाव करण्याच्या उपाययोजना करण्यास सांगितला आहे. येत्या २ तासात नागपूर, वर्धा, चंद्रपूर आणि गोंदिया जिल्ह्यात वादळ आणि अत्यंत हलका पाऊस पाडण्याची शक्यता आहे.

----------------------------------------

आयपीएल

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज आज कोलकाता इथं कोलकाता नाईट रायडर्सचा सामना गुजरात टायटन्स सोबत सायंकाळी साडेसात वाजता होणार आहे.

----------------------------------------

मुष्टियुद्ध

आशियाई मुष्टियुद्ध स्पर्धेमध्ये युवा भारतीय मुष्टियोद्ध्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे, दोन सुवर्ण पदकांसह सात रौप्य पदकांना या खेळाडूंनी गवसणी घातली.

----------------------------------------

बॅडमिंटन

बॅडमिंटनमध्ये, भारतीय पुरुष दुहेरीची जोडी सात्विक साईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी थायलंड ओपनच्या उपांत्य फेरीत मलेशियाच्या नूर इझ्झुद्दीन आणि गोह सी फेई या जोडीचा पराभव केला आहे.

----------------------------------------